MHWR080027302023

कौ.हि.म.सं.अर्ज क्र.४७/२०२३
चैताली आकाश लांजेवार + १
विरुध्द
आकाश रमेश लांजेवार + २

# निशाणी क्रमांक ५ खाली आदेश
## (आदेश दि.२०.०३.२०२५)

१. अर्जदाराने सदरचा अर्ज हा घरगुती अत्याचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (*यापुढे संक्षिप्तपणे 'कायदा' असे संबोधले आहे* ) कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ हे पती–पत्नी असून, त्यांचा विवाह दि. १३/०७/२०२१ रोजी सहकार मंगल कार्यालय, आर्वी येथे हिंदू रीतिरिवाजानुसार संपन्न झाला. गैरअर्जदार क्र.२ सासू असून, गैरअर्जदार क्र.३ हा दीर आहे. या वैवाहिक संबंधातून त्यांना 'हार्दिक' नावाचा एक मुलगा झाला असून, तो सध्या अर्जदार क्र.१ सोबतच राहतो. अर्जदार क्र.१ ही सासरी नांदण्यास गेल्यापासूनच गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी तिच्याशी क्षुल्लक कारणावरून वाद घालण्यास व भांडण करण्यास सुरुवात केली. अर्जदार हिच्या वडिलांनी स्वतःच्या आर्थिक परिस्थितीपेक्षा अधिक खर्च करून विवाह थाटामाटात लावून दिला होता. तरीही, गैरअर्जदारांनी हुंड्याच्या मागणीसाठी अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. "तुझ्या बापाने लग्नात हुंडा दिला नाही, आता तुया बापाला सोन्याचे मंगळसूत्र करून माग," या मागणीसाठी गैरअर्जदारांनी अर्जदारावर सातत्याने अत्याचार केले व तिला मारहाण केली.

३. दि.०४/१०/२०२१ रोजी दिवाळीच्या सणादिवशी "तू गरोदर राहत नाहीस" असे म्हणून गैरअर्जदारांनी तिला सोडचिठ्ठी देण्याची मागणी केली. त्यानंतरच्या काळात अर्जदार गरोदर असताना तिला बेडरूममध्ये कोंडून एकटे पाडण्यात आले व सासरच्या घरातून वरच्या मजल्यावर वेगळे काढले गेले. अशा परिस्थितीत गैरअर्जदार

क्र.१ हा स्वतः खाली जेवण करत असे आणि अर्जदाराला जेवणासाठी केवळ एक मिरची, एक वांगे किंवा बटाटा आणि अर्धे टोमॅटो आणून देऊन तिचा छळ केला जात होता. अशा कठीण परिस्थितीत चार महिने काढल्यानंतर तिला प्रसूतीसाठी माहेरी पाठवण्यात आले होते. दरम्यान, दि. २८/०२/२०२२ रोजी गैरअर्जदारांनी अर्जदाराला कोणतेही सबळ कारण नसताना बेडरूममध्ये बाहेरून कुलूप लावून सलग दोन दिवस उपाशी ठेवले, ज्याकारणाने तिची प्रकृती खालावली. गरोदरपणाची माहिती गैरअर्जदार क्र.१ ला दिली असता त्याने "मला नको सांगू, आधी ताईला व आईला सांग" असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर दि.३०/०३/२०२२ रोजी अर्जदार सासरी परतली असता, गैरअर्जदार क्र.२ हिने "हे मूल आम्हाला पाहिजे नाही, अबोर्शन करून टाक" असे म्हणत होते व अर्जदाराने नकार दिला असता तिचे केस ओढून तिला शारीरिक मारहाण केली होती.

४. प्रसूतीनंतर चार महिन्यांनी बारशाचा कार्यक्रम आटोपून अर्जदार सासरी परतली असता, गैरअर्जदारांनी बारशात मिळालेली सोन्याची भांडी व रोख रक्कम बळजबरीने हिसकावून घेतली. तसेच, सासरच्या घरी वास्तव्यास असताना गैरअर्जदार तिला कोणतेही सण किंवा उपवास करू देत नव्हते. अर्जदाराने एखादा सण साजरा केल्यास किंवा पूजा-अर्चा केल्यास सर्व गैरअर्जदार संगनमताने तिला मारहाण करीत असत. सासरच्या घरातील प्रत्येक लहान-मोठ्या गोष्टींची माहिती गैरअर्जदार क्र.१ हा आपल्या बहिणीला फोनवर देत असे आणि तिच्या सांगण्यानुसारच सर्व गैरअर्जदार वागत होते व अर्जदाराला शारीरिक व मानसिक त्रास देत होते.

५. दि.२०/०९/२०२३ रोजी गणपती उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी अर्जदाराचे केस पकडून तिला मारहाण केली आणि गैरअर्जदार क्र.३ हा सदर घटनेचे व्हिडिओ चित्रण करून गैरअर्जदार क्र.१ च्या बहिणीला पाठवित होता. तसेच, बाळ रडत असतानाही घरातील काम पूर्ण होईपर्यंत तिला बाळाला घेऊ दिले जात नव्हते आणि स्वतःही बाळाला घेत नव्हती. उलट बाळाला "अवकाली पैदा झाला, मेला तर बरे होईल" असे म्हणून अर्जदाराला

मानसिक त्रास देत होते. गैरअर्जदार हे अर्जदाराच्या हातचे चहा–पाणी घेत नसत आणि तिने केलेला स्वयंपाकही जेवत नसत. उलट, गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचे डबे तयार केल्याशिवाय तिला बाळाला स्पर्शही करू देत नव्हते. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदाराचे कपडे व चपला फेकून देत असे आणि "तुझ्या आई–बापाने संस्कार दिले नाहीत" असे म्हणून तिचा अपमान करीत असे. अर्जदाराने प्रतिकार केल्यास गैरअर्जदार क्र.३ हा व्हिडिओ काढून "तुम्हाला घराबाहेर काढण्यासाठी पुरावे जमा करत आहे" असे म्हणत असे. अर्जदाराला बेडरूममध्ये झोपायला जाण्यापूर्वी गैरअर्जदार क्र.२ ची परवानगी घेणे बंधनकारक होते आणि तसे न केल्यास तिला अश्लील शिवीगाळ व मारहाण करून "आमच्या हाताने मरुन जाशील त्या आधी सोडचिठ्ठी दे, आमच पोरग हे आमच्या रक्ताच होय तु आमची कोणीचे नव्हे" असे बोलुन तिचा मानसिक छळ केला जात होता. ऑक्टोबर २०२३ मध्ये अर्जदार पुन्हा गरोदर असताना गैरअर्जदार क्र.१ याने तिला बळजबरीने दवाखान्यात नेऊन काही गोळ्या आणून दिल्या, ज्यामुळे तिचा गर्भपात झाला. सदर प्रकृती खालावलेली असतानाही तिला सक्तीने स्वयंपाक करण्यास भाग पाडले आणि तिने आजारी असल्याचे सांगितल्यास "बिमारीचे नाटक करते" असे म्हणून तिचा मानसिक व शारीरिक छळ करीत होते.

६. दि. १२/०६/२०२३ रोजी अर्जदाराचे आई–वडील व त्यांचे मित्र कळंब येथे दर्शनाकरिता गेले होते. परत येताना ते अर्जदाराला भेटण्यासाठी यवतमाळला गेले असता, गैरअर्जदार क्र.१ घरी आला. त्यानंतर आई–वडील आर्वीकडे निघाले असता, गैरअर्जदार क्र.२ व ३ घरी आले व त्यांनी भांडण उकरून काढले. गैरअर्जदार क्र.२ ने अर्जदाराला अश्लील शिवीगाळ करून वाद निर्माण केला आणि गैरअर्जदार क्र.१ ने तिला मारहाण केली. जिवाच्या भीतीने अर्जदाराने वडिलांना फोन करून बोलावून घेतले. आई–वडील परत आले असता गैरअर्जदारांनी त्यांना गेटवरच अडवून भांडण केले व "हिचा उद्यापर्यंत जीव घेऊ" अशी धमकी दिली. अर्जदार बाळाला घेऊन निघत असताना गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी बाळाला हिसकावून घेतले. अर्जदाराच्या वडिलांनी बाळाची मागणी केली असता, गैरअर्जदार

क्र.२ ने अपमानास्पद बोलून वाद घातला आणि गैरअर्जदार क्र.१ हा चाकू व पावशी घेऊन मारण्यासाठी अंगावर धावून आला. अखेर गैरअर्जदार क्र.३ ने बाळाला आणून दिल्यानंतर अर्जदार माहेरी परतली. तेव्हापासून अर्जदार माहेरी आश्रित म्हणून राहत आहे. अर्जदार नांदावयास तयार असूनही गैरअर्जदार क्र.१ तिच्या चरित्रावर संशय घेऊन मानसिक छळ करीत आहे. अशा प्रकारे गैरअर्जदार यांनी संगणमताने अर्जदार हिचा आर्थीक, मानसिक व शारीरीक छळ केला आहे.

**अर्जदाराचे विशेष कथनः**

**७.** अर्जदाराने यापूर्वी मा.न्यायालयात घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम १२ अन्वये अर्ज दाखल केला होता, ज्यामध्ये गैरअर्जदार हजर झाले व त्यांनी लेखी उत्तर सादर केले. सदर अर्ज कलम २३ च्या सुनावणीसाठी प्रलंबित असताना, उभयतांमध्ये तडजोड होऊन अर्जदार ही गैरअर्जदारासोबत सासरी नांदण्यास गेली होती. सासरी गेल्यानंतर सुमारे दोन महिने गैरअर्जदार चांगले वागले, मात्र त्यानंतर त्यांनी पुन्हा शारीरिक व मानसिक अत्याचार सुरू केले. अर्जदाराने संसार टिकवण्यासाठी हा त्रास सहन केला. दि.२२/०७/२०२५ आणि दि. २३/०७/२०२५ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराला अश्लील शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली, ज्यामुळे अर्जदाराचे ओठ फुटले आणि छातीवर व पाठीवर गंभीर वळ उमटले. हे कृत्य होत असताना अर्जदार हिच्या लहान मुलाने "आईला मारू नका" अशी विनवणी केली असता, गैरअर्जदाराने त्याकडे दुर्लक्ष करून निर्दयपणे मारहाण सुरूच ठेवली. इतकेच नव्हे तर, "तुला निळ्या ड्रममध्ये मारून टाकीन व कोणाला कळू देणार नाही," अशी धमकी देऊन अर्जदाराकडे सोडचिठ्ठीची मागणी केली.

८. दि. २४/०७/२०२५ रोजी अर्जदाराने आपल्या आई-वडिलांना बोलावून घेतले व पोलीस स्टेशन यवतमाळ येथे तक्रार देण्यासाठी निघाली. पोलीस स्टेशनला जात असताना वाटेत गैरअर्जदाराने अर्जदाराकडून बाळाला हिसकावून घेतले. अर्जदाराने तिची कैफियत पोलिसांकडे मांडली, परंतु काही वेळातच गैरअर्जदार हा

१०-१२ लोकांना घेऊन तिथे हजर झाला. अर्जदाराच्या कथनानुसार, पोलिसांनी गैरअर्जदारावर कोणतीही कारवाई न करता त्याचीच बाजू लावून धरली. या दरम्यान अर्जदाराने ११२ क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रतिसाद मिळाला नाही. अखेर जीवाला धोका असल्याचे ओळखून अर्जदार आपल्या बाळासह आई-वडिलांसोबत माहेरी परतली आणि तेव्हापासून ती माहेरी वास्तव्यास आहे. अशा प्रकारे यवतमाळ पोलिसांनी तक्रार गांभीर्याने न घेतल्यामुळे अर्जदारावर अन्याय झाला असून, सध्याची परिस्थिती पाहता अर्जदार व तिच्या बाळाच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

९. तिने पुढे कथन केले की, तिला कुठलाही कामधंदा येत नाही, त्याचप्रमाणे तिच्यावर अर्जदार क्र.२ ची जबाबदारी आहे. याउलट गैरअर्जदार क्र.१ हा रेमंड कंपनी लोहारा, यवतमाळ येथे नोकरी करतो व त्यापासुन त्याला रुपये ३०,०००/- पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार क्र.१ कडे स्वतःचे २ मजली घर यवतमाळ येथे आहे. तसेच गैरअर्जदार क्र.२ व ३ हे सुध्दा खाजगी नोकरी करतात. गैरअर्जदार क्र.१ यांच्या उत्पन्नावर अर्जदार क्र.१ व २ ह्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबुन नाही.त्यामुळे तिने तिला रु.७,०००/- व अर्जदार क्र.२ ला रु.७,०००/- असे एकुण रु.१४,०००/- प्रति महिन्याची अंतरिम पोटगी मिळण्याचा अर्ज दाखल केला आहे.

**गैरअर्जदारांचे म्हणणे**

**१०.** प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदाराने कलम २३ अंतर्गत दाखल केलेल्या अंतरिम अर्जास स्वतंत्र लेखी उत्तर सादर केलेले नाही. त्यामुळे दिलेल्या मूळ अर्जाच्या उत्तरालाच त्यांच्या अंतरिम अर्जावरील उत्तर म्हणून ग्राह्य धरण्यात येते. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी बयानात अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक १३.०७.२०२१ रोजी झाल्याचे तसेच समस्त नातेसंबंध कबुल केलेले आहेत.

**११.** गैरअर्जदारांनी आपल्या लेखी बयाणाद्वारे अर्जदाराचे सर्व आरोप फेटाळून लावले असून, हुंड्यासाठी छळ करणे, मारहाण करणे किंवा खोलीत कोंडून उपाशी

ठेवणे हे सर्व आरोप कल्पित व निराधार असल्याचे प्रतिपादन केले आहे. गैरअर्जदारांच्या म्हणण्यानुसार, अर्जदार क्र.१ ही सुरुवातीचे तीन महिने व्यवस्थित राहिल्यानंतर घरकामात टाळाटाळ करू लागली व आपल्या माहेरच्या आर्थिक स्थितीचा गर्व करून पती व सासूला हीन वागणूक देऊ लागली. अर्जदाराने विभक्त राहण्यासाठी तगादा लावला होता व त्यावरून घरात वाद होत असत, तरीही गैरअर्जदारांनी तिला नेहमी प्रेमाने वागवले. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराला आजही नांदविण्यास तयार असून, तिने केलेले आरोप तथ्यहीन व बिनबुडाचे असल्याने सदर अर्ज फेटाळण्यात यावा, असा बचाव त्यांनी घेतला आहे.

**१२**. जरी गैरअर्जदाराने लेखी जबाबात अर्जदाराला नांदविण्याची तयारी दर्शवली असली, तरी अर्ज दाखल झाल्यापासून त्याने तिला प्रत्यक्ष नांदविण्याबाबत किंवा कायदेशीर कार्यवाहीबाबत कोणतेही ठोस पाऊल उचलल्याचे दिसून येत नाही. सध्याची महागाई आणि अर्जदार क्र. १ व तिच्या अल्पवयीन मुलाचा उदरनिर्वाह, शिक्षण व दैनंदिन गरजांचा विचार करता, त्यांना तात्पुरती आर्थिक मदत मिळणे न्यायोचित वाटते. 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्या'चा मूळ उद्देश पीडित महिला व पाल्याला तातडीने दिलासा देणे हा आहे. मुख्य अर्ज निकालात निघण्यास वेळ लागण्याची शक्यता असल्याने, प्रकरणाच्या अंतिम निकालापर्यंत अंतरिम स्वरूपात पोटगीचा दिलासा देणे न्यायाच्या दृष्टीने उचित राहील, असे न्यायालयाचे मत आहे.

## मुद्दे व त्यांचे निष्कर्ष

**१३.** न्यायालयासमोर अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमिमांसह देत आहे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने सिध्द केले आहे काय की, गैरअर्जदारांनी तिचा महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम ३ | **होकारार्थी..** |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणे कौटुंबिक हिंसाचार केला ? | |
| २. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडुन तिच्यासाठी व तिच्या मुलासाठी पोटगी म्हणून दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये ७,०००/– प्रतिमाह मिळण्यास पात्र आहे काय? | **.. अंशतः होकारार्थी** |
| ३. | अर्जदार ही घरभाडे मिळण्यास पात्र आहे ? | **नकारार्थी..** |
| ४. | अर्जदार ही तिचे स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहे काय? | **नकारार्थी..** |
| ५. | अर्जदार ही संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | **नकारार्थी..** |
| ६. | अर्जदार ही तिला आलेल्या कोर्टच्या कामाकरीता रु.२०,०००/– चा खर्च मिळण्यास पात्र आहे काय? | **नकारार्थी..** |
| ७. | आदेश काय ? | **..अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ करीता – (हिंसाचार)**

**१४**. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्या कथनाचा विचार केला असता, दोघांचे वैवाहिक संबंध आजतागायत कायम असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने तिच्या मुळ अर्जात कथन केल्याप्रमाणे तिला गैरअर्जदारांनी खूप त्रास दिलेला आहे. तसेच अर्जदारावर गैरअर्जदारांनी शारीरिक, मानसिक व आर्थीक छळ केलेला आहे, असे प्रथमदर्शणी दिसुन येते. त्यामुळे अर्जदाराच्या कथनानुसार ती कौटूंबीक हिंसाचारग्रस्त असल्यामुळे ती तिच्या मुलांसह तिच्या माहेरी राहते. **घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५** चे **कलम ३** मध्ये घरगुती हिंसाचाराची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये शारिरिक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक छळ इत्यादी बाबींचा

समावेश होतो.

**१५.** प्रकरणाचे अवलोकन केले असता सद्यस्थितीमध्ये अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांच्यामधील नातेसंबंध अस्तीत्वात असुन अर्जदार ही तिच्या मुलासह गैरअर्जदारापासुन वेगळी राहत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वरील सर्व बाबी या महिलांच्या शारिरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक हिंसाचार या व्याख्येमध्ये मोडत असल्याने गैरअर्जदाराने अर्जदाराचा घरगुती हिंसाचार केला आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे हे न्यायालय **मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ करीता – (अंतरिम खावटी)**

**१६**. अर्जदाराच्या कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ हा खाजगी नोकरी करीत असून त्याला दरमहा रु.३०,०००/– वेतन प्राप्त होते. परंतु त्याबाबत कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच गैरअर्जदाराने निशाणी क्र.१३ वर आपले 'मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र' दाखल केले आहे त्यावरुन गैरअर्जदार हा ऑपरेटर म्हणून काम करतो व त्याला मासिक वेतन रु.१६,५००/– आहे, यावरुन तो एक कुशल कामगार आहे, तो स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास कायदेशीररित्या सक्षम आहे, असे हे न्यायालय गृहीत धरत आहे. तसेच अर्जदार क्र.१ हिने **निशाणी क्र.१२** अन्वये स्वतःचे 'मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र' दाखल केले आहे. त्यावरून हे स्पष्ट होते की, अर्जदार सध्या तिच्या मुलासह माहेरी वास्तव्यास असून तिला उदरनिर्वाहाचे कोणतेही स्वतंत्र साधन नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार व तिच्या मुलाच्या उदरनिर्वाह, वैदयकीय खर्च यांचा विचार केला असता त्यांना सन्मानाने जगण्यासाठी गैरअर्जदाराकडून आर्थिक साहाय्य मिळणे न्यायोचित ठरते. अशा परिस्थितीत, गैरअर्जदार क्र.१ चे एकूण उत्पन्न, त्याची सामाजिक व आर्थिक स्थिती आणि दोन्ही अर्जदारांच्या दैनंदिन गरजांचा समतोल राखता, अर्जदार क्र.१ (पत्नी) हिला रु.३,०००/– आणि अर्जदार क्र.२ (मुलगा) याला रु.२,०००/– असे एकूण रक्कम रु.५,०००/– (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) प्रतिमाह अंतरिम आर्थिक पोटगी देणे न्यायाच्या दृष्टीने उचित होईल. त्यामुळे, मी मुद्दा क्र.२ चे उत्तर

'अंशतः होकारार्थी' म्हणून नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.३ करीताः (घरभाडे/निवास भत्ता)**

**१७.** अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडुन स्वतंत्र निवासासाठी 'निवास भत्ता' अथवा 'घरभाडे' या स्वरूपातील मदतीची मागणी केलेली आहे. तथापि, सदर मागणीच्या पुष्ट्यर्थ अर्जदार क्र.१ हिने कोणत्याही स्वरूपाचे दस्तऐवज, जसे की भाडेकरारनामा किंवा भाड्याच्या पावत्यांचे कागदोपत्री पुरावे, अभिलेखावर सादर केलेले नाहीत. कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण अधिनियम,२००५ अंतर्गत निवास आदेशाची मागणी करताना, अर्जदारास सध्या ज्या ठिकाणी वास्तव्यास आहे तेथे तिला गैरसोय होत आहे किंवा तिला स्वतंत्र भाड्याच्या निवासाची गरज आहे, हे प्रथमदर्शनी सिद्ध करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात, अर्जदार क्र.१ ही तिच्या मुलासह सध्या माहेरी वास्तव्यास असल्याचे दिसून येते. मात्र, माहेरी वास्तव्यास असताना तिला कोणत्या स्वरूपाच्या अडचणी येत आहेत किंवा तिथे राहणे तिच्यासाठी अशक्य किंवा गैरसोयीचे आहे, याबाबत कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. पर्यायी निवासाच्या मागणीसाठी अर्ज विशिष्ट व पुराव्यांवर आधारित असणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत अर्जदाराची मागणी अत्यंत सर्वसाधारण व अस्पष्ट स्वरूपाची वाटते. उपलब्ध कागदोपत्री अभिलेख व परिस्थितीचा विचार करता, सध्याच्या टप्प्यावर अर्जदाराची घरभाड्याची मागणी मान्य करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे, मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ करीताः ( स्त्रीधन/आंदण)**

**१८.** अर्जदाराने लग्नाच्या वेळी प्राप्त झालेले स्त्रीधन/आंदण (सोन्याचे दागिने व इतर वस्तू) गैरअर्जदारांच्या ताब्यात असल्याचे कथन केले आहे. तथापि, सदर कथनाच्या पुष्ट्यर्थ अर्जदाराने कोणतेही कागदोपत्री पुरावे, जसे की दागीने खरेदीच्या पावत्या, बिल किंवा इतर विश्वसनीय दस्तऐवज अभिलेखावर सादर केलेले नाहीत. तसेच, अर्जदाराने स्त्रीधनाबाबत एक हस्तलिखित यादी अभिलेखावर सादर केलेली आहे. मात्र, ती यादी कोणी तयार केली आहे, ती तयार करताना कोण उपस्थित होते

किंवा त्यास कोणताही साक्षीदार आहे का, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे सदर यादीस स्वतंत्रपणे विश्वासार्ह पुरावा म्हणून स्वीकारणे सध्याच्या टप्प्यावर शक्य नाही. अशा परिस्थितीत, स्त्रीधनाच्या परताव्याबाबत या टप्प्यावर कोणताही अंतिम आदेश देणे उचित ठरणार नाही. तथापि, प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या वेळी, उपलब्ध पुरावे व मांडणीचा सविस्तर विचार करून या मुद्द्यावर निर्णय घेता येईल. त्यामुळे, मी मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करीताः</u>** **( <u>संरक्षण आदेश</u> )**

१९. अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदारांविरुद्ध संरक्षण आदेश देण्याची मागणी केलेली आहे. तथापि, अभिलेखावर उपलब्ध कागदपत्रे व मांडणीचा विचार करता, अर्जदार ही सध्या तिच्या मुलासह माहेरी वास्तव्यास असल्याचे दिसून येते. तसेच, गैरअर्जदारांकडून अर्जदाराशी सध्या कोणताही थेट संपर्क, छळ, धमकी किंवा शारीरिक इजा करण्याचा प्रयत्न होत असल्याचे प्रथमदर्शनी अभिलेखावरून दिसून येत नाही. अर्जदार व गैरअर्जदार हे सध्या वेगवेगळ्या ठिकाणी राहत आहेत. संरक्षण आदेश देताना न्यायालयास तातडीचा व सततचा धोका आहे का, हे पाहणे आवश्यक असते. प्रस्तुत टप्प्यावर अशा प्रकारचा तात्काळ धोका आहे असा काही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तथापि, प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या वेळी, उपलब्ध पुरावे व मांडणीचा सविस्तर विचार करून या मुद्द्यावर निर्णय घेता येईल. त्यामुळे, मी **मुद्दा क्र.५ चे उत्तर नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.६ करीताः</u>** **(<u>न्यायालयीन खर्च</u>)**

**२०.** अर्जदार क्र.१ हिने प्रस्तुत अर्जामध्ये न्यायालयीन कामकाजासाठी रु. २०,०००/- इतका खर्च मिळावा अशी मागणी केलेली आहे. घरगुती हिंसाचार प्रकरणांमध्ये, कौटुंबिक हिंसाचार अधिनियमांतर्गत न्यायालयास आवश्यकतेनुसार अर्जदारास खर्च मंजूर करण्याचा अधिकार आहे. तथापि, सदर मागणीच्या समर्थनार्थ अर्जदाराने कोणताही ठोस पुरावा, जसे की वकील फी संदर्भातील पावत्या, खर्चाचा तपशील किंवा इतर लेखी दस्तऐवज पुरावे अभिलेखावर सादर केलेले नाहीत. तसेच,

प्रस्तुत प्रकरणात अर्जदारास अंतरिम पोटगी मंजूर करण्यात आलेली असून, तिच्या व अल्पवयीन मुलाच्या उपजीविकेसाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. सदर परिस्थितीत आणि अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचा विचार करता, स्वतंत्रपणे रु. २०,०००/- इतका न्यायालयीन खर्च मंजूर करणे उचित व आवश्यक वाटत नाही. त्यामुळे मी **मुद्दा क्र.६** चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ७ करीता** – (**आदेश**)

**२१**. मुद्दा क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करुन, मुद्दा क्र.६ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करीत आहे..

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना, मूळ अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून ते या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत, दरमहा अर्जदार क्र.१ (पत्नी) हिच्यासाठी रुपये ३,०००/- व अर्जदार क्र.२ (मुलगा) याच्यासाठी रुपये २,०००/- असे एकूण रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) अंतरिम आर्थिक सहाय्य (पोटगी) अदा करावी. सदर रक्कम प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी किंवा त्यादिवशी अर्जदार क्र.१ हिच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी.

३. आदेशाची प्रत ही उभयपक्षांना मोफत द्यावी.

MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Digitally signed by MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Date: 2026.03.20 17:59:46 +0530

आर्वी.
दिनांकः–२०/०३/२०२६

**(एम. जी. हिंगणघाटे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, आर्वी.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Atul C. Gote |
| Name of the Court | : | M. G. Hinganghate,<br>J.M.F.C.,Court No.1, Arvi. |
| Date of Order | : | 20.03.2026 |